ePaper **“संजय राऊतांनी शिवसेना, राष्ट्रवादी संपवली: संजय निरुपम !**



‖ वर्ष - 7 । अंक - 314 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 3 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- लखनऊने नोंदवला दुसरा विजय
- पूजा रोहन ला करतेय डेट?
- ते चीनचं नाव घ्यायलाही घाबरतात
- कच्चथिवूवरून मोदींवर पलटवार

## पिंपरी-चिंचवड महापालिका उत्पन्नात वाढ

# बांधकाम विभाग ‘मालामाल’!

### » तब्बल 804 कोटींचा टप्पा पार : गतवर्षीपेक्षा 20 टक्क्यांनी चढता आलेख

। पिंपरी। महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवाना आणि अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी महसुली उत्पन्नात ८०४ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. मागील वर्षीपेक्षा या उत्पन्नामध्ये २० कोटी रुपयांची वाढ झाली आहे.**



“ आर्थिक वर्षातील कामगिरीमध्ये गेल्या तिमाहीत बांधकाम परवाना विभागाच्या उत्पन्नात विक्रमी ४८ टक्के वाढ झाली आहे. या उत्पन्न वाढीमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील बांधकाम व्यावसायिकांचा मोलाचा वाटा आहे. यामध्ये ३८९ कोटी रुपयांचा भरणा पिंपरी चिंचवड शहरातील बांधकाम व्यावसायिकांडून करण्यात आला आहे.



**– शेखर सिंह,**
**आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

२०२३-२४ आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या सहामाहीत, विभागाच्या महसुलात घट झाली होती. जेथे उत्पन्नाच्या केवळ २८ टक्के म्हणजेच २२४ कोटी रुपये जमा झाले होते. त्यानंतरच्या तिमाहीमध्ये महापालिकेने धोरणांची परिणामकारकता दाखवून उत्पन्नात उल्लेखनीय बदल घडवून आणले. तिसऱ्या तिमाहीत विभागाच्या उत्पन्नात २४ टक्के वाढ दिसून आली. तर डिसेंबर २०२३ अखेरीस उत्पन्नात ४१५ कोटी रुपयांहून अधिक वाढ झाली. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील म्हणाले की, महापालिकेच्या बांधकाम परवाना आणि अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने २०२३-२४ या आर्थिक वर्षातील महसुलात ८०४ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या सहामाहीत आव्हानांचा सामना करूनही सामुहिक प्रयत्नांमुळे प्रशंसनीय परिणाम मिळाले असून त्यानंतरच्या तिमाहीत महसुलात लक्षणीय वाढ झाली आहे. महसूल निर्मिती वाढविण्यासाठी महापालिकेच्या धोरणांची परिणामकारकता याद्वारे दिसून येते. शहर अभियंता मकरंद निकम म्हणाले की, शहराच्या एकूण आर्थिक प्रगतीमध्ये योगदान देत असताना बांधकाम व्यावसायिकांचा महापालिकेच्या महसुलामध्येही महत्वाचा वाटा आहे. बांधकाम उपक्रमांच्या उत्पन्नात झालेली वाढ ही पिंपरी चिंचवड शहरात होत असलेल्या विकासाचा पुरावा आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी १०० टक्के महसुल गोळा करण्याचे महापालिकेचे लक्ष्य असणार आहे.

## पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर आज-उद्या ‘ब्लॉक’

### » गॅन्ट्री बसवण्याच्या कामाचे नियोजन : सर्व प्रकारची वाहतूक राहणार बंद

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर बुधवार (दि. 3 APRIL ) आणि गुरुवारी (दि. 4 APRIL ) दुपारी बारा ते दोन या कालावधीत ब्लॉक घेतला जाणार आहे. द्रुतगती मार्गावर गॅन्ट्री बसवण्याचे काम या कालावधीत केले जाणार आहे.**



यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत मुंबई व पुणे वाहिनीवर किमी 93/900 येथे 3 व 4 एप्रिल रोजी दुपारी 12 ते 2 या दरम्यान गॅन्ट्री बसविण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. गॅन्ट्री बसविताना मुंबई व पुणे वाहिनीवरील सर्व प्रकारच्या हलक्या व जड अवजड वाहनांची वाहतूक पूर्णतः बंद राहील. द्रुतगती मार्गावरुन पुणे ते मुंबईकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने किवळे ब्रिज वरून जुना मुंबई – पुणे मार्गाने मुंबईच्या दिशेने वळविण्यात येतील. मुंबईहून पुण्याकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने कुसगाव टोलनाका किमी 55.000 वरुन (लोणावळा एक्झीट) येथून जुना मुंबई -पुणे मार्गावरुन पुणेच्या दिशेने मार्गस्थ होतील.

## चिंचवडमध्ये वृद्धाचा मृत्यू...

» भरधाव वेगातील कारने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार वृद्धाचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (दि. 2) दुपारी वाल्हेकरवाडी, चिंचवड येथे घडली. शालिवाहन सखाराम कल्याणी (वय 65, रा. चिंचवडेनगर, चिंचवड) असे अपघातात मृत्यू झालेल्या वृद्धाचे नाव आहे. मयत शालिवाहन हे दुचाकीवरून बिजलीनगरहून चिंतामणी चौकाच्या दिशेने येत होते. त्यावेळी एक कार (एमएच 14/एफजी 8118) भरधाव वेगात आली. कार चालकाला गतीरोधकाचा अंदाज न असल्याने कार अनियंत्रित झाली. कारने पुढे चाललेल्या शालिवाहन यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शालिवाहन यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

# मोरे, बांदल अखेर 'वंचित'चे उमेदवार!

## » 'महाईन्यूज'चे वृत्त खरे ठरले : पुणे, शिरूर लोकसभा त्रिशंकू होणार!

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकसभेसाठी वंचित बहुजन आघाडीने आज (ता.२ एप्रिल) पाच उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. यामध्ये पुणे लोकसभा मतदारसंघातून वसंत मोरे यांना 'वंचित'कडून उमेदवारी देण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी वसंत मोरे यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची भेट घेत उमेदवारी संदर्भात चर्चा केली होती. यानंतर अखेर वसंत मोरे यांना 'वंचित'कडून उमेदवारी जाहीर झाली आहे.**








यासंदर्भातील माहिती वंचित बहुजन आघाडीने ट्विटरवरून दिली आहे.'महाईन्यूज' ने दि. २९ मार्च रोजी "दबंग नेते संदीप वाघेरे, वसंत मोरे अन् मंगलदास बांदल वंचितचे उमेदवार?" असे वृत्त प्रसिद्ध केले होते. या तीन नेत्यांपैकी मोरे आणि बांदल यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली. पुणे लोकसभा मतदारसंघात काँग्रेसकडून रवींद्र धंगेकर तसेच भाजपाकडून मुरलीधर मोहोळ निवडणुकीच्या मैदानात आहेत. आता वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे यांना उमेदवारी जाहीर झाल्यामुळे पुण्यात तिरंगी लढत होणार आहे. वसंत मोरे यांनी काही दिवसांपूर्वी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचीदेखील भेट घेतली होती. तसेच खासदार शरद पवार यांचीही भेट घेतली होती. वसंत मोरे यांनी या भेटी पुण्यातून उमेदवारी मिळण्यासंदर्भात घेतल्याचे सांगितले जात होते. शिरुरमधून मंगलदास बांदल वंचितकडून मैदानात उतरले आहेत. त्यामुळे महायुतीचे शिवाजीराव आढळराव पाटील आणि महाविकास आघाडीचे खासदार अमोल कोल्हे अशी त्रिशंकू निवडणूक पहायला मिळणार आहे.

### 'वंचित'ने पाच उमेवारांची घोषणा केली?

» वंचित बहुजन आघाडीने आघाडीने अधिकृत ट्विटर अकाऊंटवरुन उमेदवारांची घोषणा केली. यामध्ये अविनाश भोसिकर-नांदेड (लिंगायत), बाबासाहेब भुजंगराव उगले-परभणी (मराठा), अफ्सर खान-छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) (मुस्लिम), वसंत मोरे-पुणे (मराठा), मंगलदास बांदल-शिरुर (मराठा), या पाच उमेदवारांची यादी ट्विटरवरुन जाहीर केली आहे.

# मावळात घोषणा 'फिर एक बार, मोदी सरकार'!

## » लोकसभा निवडणूक : श्रीरंग बारणे यांचा पनवेलमध्ये प्रचार

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'अब की बार, ४०० पार', 'फिर एक बार, मोदी सरकार' अशा घोषणा देत, फटाक्यांची आतषबाजी करीत पनवेलमधील भाजप कार्यकर्त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप- राष्ट्रवादी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.**



शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीची अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर खासदार बारणे यांनी प्रथमच पनवेल येथे भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयास सदिच्छा भेट दिली. भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदींनी त्यांचे स्वागत केले व तिसऱ्यांदा उमेदवारी मिळाल्याबद्दल सत्कार केला. त्यावेळी बाळासाहेब पाटील, रामदास शेवाळे, नितीन पाटील, परेश ठाकूर, अनिल भगत, अरुण भगत, वाय. के. देशमुख, प्रथमेश सोमण, चंद्रशेखर सोमण, रमेश घोडेकर, प्रवीण मोहकर आधी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामशेठ ठाकूर म्हणाले की, यापूर्वीच्या दोन्ही निवडणुकांपेक्षा यावेळी वातावरण फार चांगले आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार एकत्र आल्यामुळे महायुतीची 'महाशक्ती' झाली आहे. खासदार बारणे यांना घाटावर मिळणाऱ्या मताधिक्यात कोकणातील तिन्ही मतदारसंघ मोठी भर घालतील व बारणे तीन ते साडेतीन लाखांच्या विक्रमी आघाडीने जिंकतील, असा विश्वासही रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने केलेले काम सर्वसामान्यांपर्यंत पोहचले आहे. या सर्व लाभार्थींपर्यंत पोहोचण्याचे काम भाजप कार्यकर्त्यांनी केले आहे. त्या कामाच्या जोरावर बारणे यांना पनवेलमधून विक्रमी मताधिक्य मिळेल. चिंचवडपेक्षाही जास्त मताधिक्य मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न राहील. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रास्ताविक केले. नितीन पाटील यांनी आभार मानले. प्रवीण मोहकर यांनी सूत्रसंचालन केले.

### विक्रमी मताधिक्य मिळेल : बारणे

» मागील दोन्ही निवडणुकांमध्ये दिलेल्या साथीबद्दल खासदार बारणे यांनी भाजप कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले. गेल्या दहा वर्षांमध्ये आपण पनवेल, कर्जत व उरण या भागात सातत्याने संपर्कात राहून विकासकामांना गती दिली आहे. मध्यंतरी उद्धव ठाकरे यांनी वेगळी भूमिका घेतल्यामुळे काही काळ विरोधात बसावे लागले, मात्र आपण कधीही कटुता निर्माण होऊ दिली नाही. पनवेलचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद सदैव पाठीशी आहेत. त्यामुळे विक्रमी मताधिक्य मिळेल याबाबत कोणतीही शंका नाही, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

## महापालिका प्रशासनाकडून शिल्पाचे काम प्रगतीपथावर

# भोसरीत साकारतेय बैलगाडा शर्यत शिल्प!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बैलगाडा शर्यत आणि शेती-माती-संस्कृतीप्रति प्रचंड आग्रही असलेले भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आता महाराष्ट्रातील सर्वात मोठे बैलगाडा शर्यत शिल्प उभारण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून भोसरीत शिल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. हे शिल्प बैलगाडा शर्यतप्रेमी आणि नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.**



भोसरी विधानसभा मतदार संघातील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र व भोसरी गावजत्रा मैदान परिसरात येथे ग्रामसंस्कृती, पारंपरिक क्रीडा प्रकार यासह बैलगाडा शर्यत अशी आकर्षक शिल्प उभारण्यात येणार आहेत. त्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून हे काम हाती घेण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रभाग क्रमांक ७ येथील भोसरी स्मशान भूमी ते अग्निशामक केंद्रापर्यंतचा रस्ता अद्ययावत पद्धतीने विकसित करण्यात येत आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती प्रशिक्षण केंद्र, आंतरराष्ट्रीय दर्जाचे कबड्डी संकूल उभारण्यात आले आहे. तसेच, भोसरी स्मशानभूमीचेही नूतनीकरण यापूर्वीच झाले आहे.

भोसरीतील गावजत्रा मैदान येथे महाराष्ट्रा संस्कृती आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा खेळ असलेला परंपरागत बैलगाडा घाट आहे. महाराष्ट्राची ग्रामसंस्कृती, बैलगाडा शर्यत यासह कुस्तीसारख्या मर्दानी खेळाबाबत नव्या पिढीत जनजागृती व्हावी. आपली शेती-माती आणि संस्कृतीबाबत अभिमान निर्माण व्हावा. या करिता या रस्त्याच्या सुशोभिकरणात विविध शिल्प उभारण्यात येणार आहे.

### बैलगाडा शर्यतप्रेमींमध्ये समाधान...

» राज्यातील बैलगाडा शर्यतींवरील बंदी उठवण्यासाठी आमदार लांडगे यांनी राज्यव्यापी चळवळ उभी केली होती. अखिल भारतीय बैलगाडा शर्यत संघटनेच्या माध्यमातून या लढ्याला बळ देण्यात आले. सर्वोच्च न्यालयात यशस्वी लढा दिला. त्यानंतर राज्यातील बैलगाडा शर्यती सुरू झाल्या. त्यानंतर आमदार लांडगे यांच्या पुढाकाराने भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत घेण्यात आली. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले होते. आता बैलागडा शर्यत शिल्प उभारण्यात येणार आहे. त्यामुळे गाडामालक, बैलगाडा प्रेमींमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

“ महाराष्ट्राची ग्रामसंस्कृती, बैलगाडा शर्यत, कुस्ती, कबड्डी, योगमुद्रा अशा विविध शिल्पांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती आणि विधायक संदेश जाईल. या संकल्पनेतून भोसरी गावजत्रा मैदान परिसर, तसेच स्मशान भूमी ते अग्निशामक केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे काम करताना सुशोभिकरण करावे, अशी सूचना केली होती. त्यानुसार शिल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

**-महेश लांडगे, आमदार,**
**भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# संजोग वाघेरे यांनी घेतले एकविरा देवीचे दर्शन!

### लोकसभा निवडणूक रणसंग्राम : आशिर्वाद घेऊन मावळ तालुक्यातील प्रचार दौऱ्याची सुरुवात

। लोणावळा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी आज, मंगळवार (दि. 2) सकाळी कार्ला गडावर जाऊन कुलस्वामिनी आई एकविरेचे दर्शन घेतले. मनोभावे माथा टेकवून एकविरेचे मातेचे आशिर्वाद घेऊन त्यांनी मावळ तालुक्यातील प्रचार दौ-याला सुरुवात केली.**




शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष गौतम चाबुकस्वार, मारुती आडकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष यशवंत मोहोळ, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ पडवळ, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुकाध्यक्ष आशिष ठोंबरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) महिलाध्यक्षा रत्नमाला कारंडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महिलाध्यक्षा शैलजाताई खंडागळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे देहूरोड शहराध्यक्ष हाजीमलंग मरियत्तू, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे देहूरोड शहराध्यक्ष भरत नायडू, शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिकेत घुले आदी उपस्थित होते.

एकविरा आईच्या दर्शनानंतर मंगळवारी वेहेरगाव, दहिवली, पाथरगाव, खामशेत, खडकाळा, कुसगाव, चिखलसे, येवलेवाडी, नायगाव, अहिरवडे, मोहीतेवाडी, ब्राम्हणवाडी, वडगाव, सांगावी, कान्हे, साते शिवस्मारक आदी गावांमधून संजोग वाघेरेंचा प्रचार गावभेट दौरा पार पडला. यावेळी गावागावातून मिरवणूक काढून, फटाक्यांची आतषबाजी करून वाघेरे पाटलांचे जल्लोषात आणि मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत करण्यात आले होते. यात थोरामोठ्यांसह लहान मुले देखील जोरजोरात वाघेरेंच्या विजयासाठी घोषणा देत होती. माता-भगिनींनी संजोग वाघेरे पाटील यांना मनापासून आशीर्वाद दिले. या निमित्ताने संजोग वाघेरे पाटील यांच्या आतला समाजाची जान असणारा कुटुंबवत्सल माणूसही यानिमित्ताने मावळ लोकसभेतील जनतेला पाहायला मिळाला.

### लोकल प्रवाशांची क्रूर थट्टाच...

**»गेल्या दहा वर्षात विद्यमान खासदारांनी बऱ्याच थापा मारल्या आहेत. पुणे -लोणावळा आणि लोणावळा-पुणे दरम्यान लोकल च्या बऱ्याच समस्या आहेत. या पार्श्वभूमीवर लोकलने दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची त्यांनी एका अर्थी ही क्रूर थट्टाच केल्याचे या वेळी बोलले जात होते. विद्यमान खासदारांनी मावळ लोकसभा मतदार संघातील अत्याधुनिक रेल्वे स्टेशन्स सुरु केल्याच्या थापा मारून लोकल प्रवाशांची क्रूर थट्टाच केली आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया प्रचार दरम्यान उमटत आहेत.**

---

## आयुक्तांनी ३९ आरोपींवर लावला मोक्का!

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील आठ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील एकूण ३९ आरोपींवर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. शहरातील गुन्हेगारी समूळ नष्ट करण्याच्या हेतूने पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे हे ठोस पाऊल उचलत आहेत. सध्या पिंपरी-चिंचवडमध्ये 'चौबे पॅटर्न' बघायला मिळत असून गुन्हेगारांना हद्दपार करण्याचं काम सध्या पोलीस आयुक्त करताना दिसत आहेत. निवडणूका भयमुक्त आणि नि:पक्षपाती पार पडाव्यात यासाठी पिंपरी- चिंचवड पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी २०२४ मध्ये आजतागायत आठ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील एकूण ४० आरोपींवर मोक्कांतर्गत कारवाई केली आहे. निवडणुका आल्या की गुन्हेगारी टोळ्या सक्रिय होतात. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असतंअनेक गुंड हे स्थानिक नेत्यांनी पोसल्याचं देखील बघायला मिळतं. यामुळे अशा गुंडांवर पिंपरी- चिंचवड पोलिसांनी वचक राहावा यासाठी ३९ आरोपींवर मोक्काअंतर्गत कारवाई केली आहे.




# संगीत खंजीर कल्लोळ...

**आपल्याप्रमाणे प्रकाश आंबेडकरांनीही काँग्रेस आणि शरद पवारांमागे स्वाभिमान गुंडाळून फरफटत यावे, अशी उद्धव ठाकरेंची अपेक्षा असेल. ही अपेक्षा पूर्ण करण्यास प्रकाश आंबेडकरांनी नकार दिला. आंबेडकरी चळवळ काँग्रेसच्या दावणीला बांधायची नाही, हा भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचा वज्रनिर्धार होता...**

श्रीमान उद्धवराव ठाकरे यांनी आपल्या हुकमी खंजीर अस्त्राचा वापर पुन्हा केला आहे. यावेळी त्यांच्या खंजिराचे लक्ष्य होते प्रकाश आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी. त्याआधीच्या घडामोडी अशा की, आपल्याविरोधात अकोल्यामधून उमेदवार देण्याचा प्रस्ताव संजय राऊत यांनी महाविकास आघाडीच्या बैठकीत मांडला होता, असे पत्रकार परिषदेत जाहीर करून प्रकाश आंबेडकरांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. “संजय राऊत तुम्ही खोटं बोलत आहात,” असे थेट सुनावणाऱ्या प्रकाश आंबेडकरांना उत्तर देण्याचे धैर्य उद्धव ठाकरे, संजय राऊत या दोघांनीही दाखवले नाही. या घटनेतून उद्धव ठाकरेंच्या खंजीर कल्लोळाचा आणखी एक प्रयोग राज्याच्या राजकीय पटलावर सादर झाला. या ‘संगीत खंजीर कल्लोळ’ नाट्याचा पहिला प्रयोग अद्याप विसरला गेलेला नसताना त्यांनी हे धारिष्ट्य केले आहे.दीड वर्षापूर्वी मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर उद्धव ठाकरेंना राजकारणात



टिकण्यासाठी आधाराची गरज भासू लागली. याच गरजेपोटी त्यांनी प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीपुढे सहकार्याचा हात पुढे केला. आंबेडकरांनीही त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. लोकसभा निवडणुकीची लगबग सुरू झाल्यानंतर प्रकाश आंबेडकरांनी उद्धव ठाकरे यांच्या बरोबरची आघाडी कायम ठेवण्याला प्राधान्य दिले. महाविकास आघाडीत उद्धव ठाकरे यांनी जागा वाटपात आमची बाजू काँग्रेस-राष्ट्रवादीला पटवून द्यावी, अशी भूमिका प्रकाश आंबेडकरांनी वारंवार घेतली होती. मात्र जागा वाटपासाठी बैठकांची लगबग सुरू झाल्यावर उद्धव ठाकरेंना प्रकाश आंबेडकरांपेक्षा काँग्रेस आणि शरद पवार महत्त्वाचे वाटू लागले. काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून जागा वाटपामध्ये आपला योग्य तो सन्मान राखला जात नाही, हे लक्षात आल्यानंतर प्रकाश आंबेडकरांनी याबद्दलचा संताप जाहीरपणे व्यक्त केला. हा संताप व्यक्त करताना प्रकाश आंबेडकरांनी उद्धव ठाकरेंचे सल्लागार संजय राऊत यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केले. ‘संजय राऊतांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीत खंजीर खुपसला,’ अशा शब्दांत प्रकाश आंबेडकर यांनी आपला उद्वेग जाहीरपणे व्यक्त केला. काँग्रेसने आंबेडकरी चळवळीचा कायमच अपमान केला आहे. कोट्यवधी उपेक्षितांची प्रेरणा असणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना काँग्रेस नेतृत्वाने लोकसभा निवडणुकीत दोनदा पराभूत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेसवर अनेकदा कठोर टीकेचे प्रहार केले होते. आंबेडकरी चळवळ काँग्रेसच्या दावणीला बांधायची नाही, हा डॉ.बाबासाहेबांचा वज्रनिर्धार होता.

हा निर्धार त्यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत स्वाभिमानाने जपला. जागा वाटपामध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीपुढे आम्ही लाचारी पत्करणार नाही, असे प्रकाश आंबेडकरांनी अनेकदा सांगितले. आपल्याप्रमाणे आंबेडकरांनीही काँग्रेस आणि शरद पवारांमागे स्वाभिमान गुंडाळून फरफटत यावे, अशी उद्धव ठाकरेंची अपेक्षा असेल. ही अपेक्षा पूर्ण करण्यास प्रकाश आंबेडकरांनी नकार दिला. राजकारणात दीर्घकाळ टिकायचे असेल तर आपली विश्वासार्हता राखली पाहिजे, हा राजकारणाचा प्राथमिक नियमही उद्धव ठाकरेंना मान्य नसावा. त्यामुळेच त्यांनी प्रकाश आंबेडकरांपेक्षा काँग्रेस आणि शरद पवारांना प्राधान्य दिले असावे.२०१९ मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका भारतीय जनता पार्टीच्या साथीने लढविणाऱ्या उद्धवरावांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच नावावर मतांचा जोगवा मागितला होता. विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेने १६१ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते. निकाल जाहीर होत असताना उद्धवरावांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी नेतृत्वाने खुणवाखुणवी चालू केली होती. ‘भारतीय जनता पार्टीबरोबरची युती तोडा, आम्ही तुम्हाला मुख्यमंत्री बनविण्यासाठी पाठिंबा देतो.

## संपादकीय »

# टाकसाळ

***तगड्या बुद्धिवंतांची, निर्भीड प्रशासकांची देदीप्यमान परंपरा रिझर्व्ह बँकेस आहे. नव्वदीनंतरही ती जपण्याची जबाबदारी देशातील समंजस व सुशिक्षितांची...***

संस्था मोठ्या कधी होतात? त्या संस्था हाताळणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना मोठे होण्याचे स्वातंत्र्य दिले की ही माणसे मोठी होतात आणि स्वत: मोठे होण्याच्या प्रवासात आपल्या संस्थेलाही मोठे करतात. अशी आपल्या देशातील मोठी झालेली संस्था म्हणजे रिझर्व्ह बँक. सोमवारी ती नव्वदाव्या वर्षात पदार्पण करती झाली. खरे तर यानिमित्ताने आयोजित सोहळ्यात कोणी आंतरराष्ट्रीय ख्यातीचा तज्ज्ञ मार्गदर्शन करता अथवा रिझर्व्ह बँकेच्या हयात असलेल्या नामवंत माजी गव्हर्नरांस बोलावून काहीएक बौद्धिक कार्यक्रम होता तर ते त्या बँकेच्या उच्च बौद्धिक परंपरेस साजेसे ठरले असते. तसे काही झाले नाही आणि एखाद्या नव्या ‘वंदे भारत’ला हिरवा झेंडा दाखवण्यासारखा कार्यक्रम झाला. हे साजेसेच म्हणायचे. परंतु असे वारंवार होत राहिले की मोठ्या संस्था लहान लहान होऊ लागतात.

नागरिकत्व कायदा, १९५५ या नागरिकत्वाच्या अनुषंगाने असलेल्या पायाभूत कायद्यामध्ये २०१९ साली दुरुस्ती केली गेली. ११ मार्च २०२४ रोजी अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने अधिसूचना जारी केली. हा दुरुस्तीचा कायदा अत्यंत वादग्रस्त ठरला आणि देशभर आंदोलने झाली. मुळात विरोध अथवा समर्थन करण्यापूर्वी ही दुरुस्ती काय आहे.

# धर्मनिरपेक्ष नागरिकत्वावर हल्ला?

हे संविधानाच्या चौकटीत समजावून घेतले पाहिजे.१९५५ साली केलेल्या नागरिकत्व कायद्याने नागरिक असण्याचे निकष ठरवले. या कायद्यामध्ये ‘बेकायदा स्थलांतरित’ असा शब्द वापरला होता. या बेकायदा स्थलांतरितांना नागरिकत्व देण्यासंदर्भात कठोर नियम होते. २०१९ साली केलेल्या या दुरुस्तीचा उद्देश नागरिकत्व मिळवण्यासाठीची प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ करणे हा आहे, असे सांगितले गेले. या तरतुदीनुसार, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेशपैकी कोणत्याही देशातील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी किंवा ख्रिश्चन यांपैकी कुठल्याही धर्माची व्यक्ती ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आलेली असेल तर काही विशिष्ट सरकारी नियमांतर्गत त्या व्यक्तीला बेकायदा स्थलांतरित न मानता, रीतसर नावनोंदणी करून भारताच्या नागरिकत्वासाठी अर्ज करता येईल.हा कायदा करताना संसदेत चर्चा झाली. त्या वेळी सरकारतर्फे




असे सांगण्यात आले की, पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या देशांमध्ये अल्पसंख्य धार्मिक समूहांचा छळ होत असल्याने या कायद्याद्वारे आपण त्यांना विशेष सवलत देत आहोत. आता गंमत म्हणजे हा मूळ उद्देश आहे, असे सांगितलेले असले तरी मूळ कायद्यामध्ये धार्मिक छळाचा उल्लेख नाही, हे विशेष. या कायद्याविषयीचे आक्षेप विरोधकांनी नोंदवले- (१) या तीन देशांची निवड : नागरिकत्व दुरुस्ती कायद्यामध्ये हे तीन देश का निवडले याचा तर्क स्पष्ट होत नाही. ही निवड वाजवी नाही. (२) धार्मिक छळ : धार्मिक छळ झाला आहे, असे अल्पसंख्य समूह निवडले आहेत असे तोंडी म्हटले असले, तरी लेखी कायद्यात समावेश नाही. भारताचे नागरिकत्व धर्मनिरपेक्ष तत्त्वांना अनुसरून आहे. भारताच्या नागरिकांवर धर्माच्या आधारे भेदभाव होणार नाही, हे संविधानाच्या अनुच्छेद १५ मध्ये म्हटले आहे; मात्र मुद्दा स्थलांतरितांचा आहे, असा युक्तिवाद केला जातो. त्यामुळे एक प्रकारे स्थलांतरितांमध्ये भेदभाव केला जाऊ शकतो; मात्र हे सोयीस्करपणे विसरले जाते की, संविधानाचा अनुच्छेद १४ सांगतो की, राज्यसंस्थेसमोर सर्व जण समान आहेत आणि राज्यसंस्था सर्वांना समान वागणूक देईल. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, अनुच्छेद १४ मध्ये ‘नागरिक’ म्हटलेले नाही. भारतीय संघराज्याच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला समान वागणूक दिली जाईल, असा या अनुच्छेदाचा अर्थ आहे. त्यामुळे स्वाभाविकच संविधानाच्या धर्मनिरपेक्षतेच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असा हा कायदा आहे, अशी टीका सुजाण नागरिकांनी आणि अभ्यासू विरोधकांनी केली. त्यामुळेच या कायद्याच्या संवैधानिक वैधतेसमोर प्रश्नचिन्ह आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कच्चथिवूवरून पवारांचा मोदींवर पलटवार

## मोदी देशातील राष्ट्रीय घटनांकडे गांभीर्याने पाहत नाहीत

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत आणि श्रीलंकेदरम्यानच्या कच्चथिवू बेटाचा मुद्दा सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. विशेषत: भारतात लोकसभा निवडणुकांचं वातावरण तापलेलं असताना त्यात कच्चथिवू बेटावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर केलेल्या आरोपांची चर्चा होऊ लागली आहे. काँग्रेसनं कोणत्याही परताव्याशिवाय हे बेट श्रीलंकेला आंदण दिल्याचा आरोप मोदींनी मीरतमध्ये झालेल्या प्रचारसभेत केला होता. या मुद्द्यावरून इंदिरा गांधींच्याही नावाचा सातत्याने उल्लेख केला जातोय.**



इंदिरा गांधी यांच्याच कार्यकाळात हा व्यवहार झाल्याचं म्हटलं जातंय. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना चोख पलटवार केला आहे."काल (१ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी दक्षिणेत होते. इंदिरा गांधींच्या कार्यकाळात देशातील सर्व लहान बेटं श्रीलंकेला देण्यात आल्याचं त्यांनी म्हटलं. याआधी हे प्रकरण कधीच सार्वजनिक करण्यात आलं नव्हतं. एका बाजूला पंतप्रधान नरेंद्र मोदी हयात नसलेल्या इंदिरा गांधी यांच्यावर हल्ला करतात, तर दुसऱ्या बाजूला हजारो चौरस फुटांच्या जागा त्यांनी चीनला दिल्याबाबत ते एक शब्दही काढत नाहीत. ते याकडे दुर्लक्ष करतात आणि अशा छोट्यामोठ्या गोष्टींकडे ते जाणीवपूर्वक लक्ष वेधतात. देशातील राष्ट्रीय घटनांकडे ते गांभीर्याने पाहत नाहीत", अशी टीका शरद पवारांनी केली.१९७४ साली भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी व श्रीलंकेचे राष्ट्रपती सिरिमावो भंडारनायके यांच्यात 'इंडो-श्रीलंका सागरी करार' झाला. यानुसार कच्चथिवू बेट श्रीलंकेकडे सुपूर्द करण्यात आलं. मात्र, या करारात बेटाच्या हद्दीत मासेमारी कुणी करायची? यासंदर्भात ठोस सूचना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे कालांतराने श्रीलंकेनं भारतीय मच्छिमारांना बेटाच्या हद्दीत प्रवेशावर मर्यादा आणल्या. मोदींनी याच मुद्द्यावर बोट ठेवत काँग्रेसवर टीका केल्यानंतर हे प्रकरण पुन्हा चर्चेत आलं.यासंदर्भात श्रीलंकेच्या मंत्रीमंडळातील एक मंत्री जीन थोंडमन यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना भूमिका स्पष्ट केली आहे. "कच्चथिवू बेट श्रीलंकेच्या हद्दीत येतं. नरेंद्र मोदींचे श्रीलंकेशी असणारे संबंध चांगले आहेत.

### चीनने 56 भागांची नावे बदलली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील निवडणुकीवेळी ५६ इंचाची छाती असल्याचा नारा देत ही टॅगलाइन वापरली होती. यानंतर ही टॅगलाइन खूप हिट ठरली होती. त्यानंतर यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विरोधकांकडून टीकाही झाली होती. तसेच केंद्रात मोदी सरकार सत्तेत अल्यानंतर देशातील काही शहराचे आणि रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याचा निर्णय घेतला होता. त्यामध्ये अलाहाबादचे प्रयागराज (उत्तर प्रदेश) आणि महाराष्ट्रातील औरंगाबाद, उस्मानाबाद या जिल्ह्यांची नावे बदलण्याच्या प्रस्तावाला केंद्राने मंजूरी दिली होती. यानंतर ही नावे अनुक्रमे 'छत्रपती संभाजीनगर' आणि 'धाराशिव' देण्यात आली.आता याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत एक खोचक ट्टिट केले. ट्टिटमध्ये म्हटले, "इथे मोदीजींनी ५६ इंचाची छाती म्हणून भारतातील शहराची नावे बदलली. मात्र, तिकडे चीनने अरुणाचलप्रदेश सीमेवरील आतापर्यंत ५६ भागांची नावे बदलली आहेत", असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने म्हटले आहे.

आत्तापर्यंत कच्चथिवू बेट परत करण्यासंदर्भात भारतानं कोणतीही अधिकृत भूमिका आमच्याकडे मांडलेली नाही. जर अशी कोणती भूमिका भारतानं मांडली, तर त्यावर आमचं परराष्ट्र मंत्रालय उत्तर देईल", असं ते म्हणाले.नने अरुणाचल प्रदेश सीमेवरील जवळपास ३० ठिकाणांची नावे बदलल्याचे वृत्त आहे. यावरून भारत आणि चीनमध्ये शाब्दिक युद्ध सुरू आहे. चीनने अरुणाचल प्रदेशला आपला भाग म्हटले, तर अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी चीनला ठणकावून सांगितले. तसेच अरुणाचल प्रदेशमधील काही ठिकाणांची नावे बदलल्याने कोणताही परिणाम होणार नसल्याचेही मंत्री एस.जयशंकर म्हणाले. भारतात सध्या लोकसभेची निवडणूक जाहीर झालेली आहे.

# वापरा आणि फेका हीच भापजची नीती

## महाविकास आघाडीच्या प्रचारसभेत आदित्य ठाकरे यांची टीका

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात भाजप मित्रपक्षांना 'वापरा आणि फेका' या नीतीने वागवत आहे. केंद्रातील महाशक्ती आता तानाशाहीत बदलली आहे. त्यामुळे देशात परिवर्तनाचे वारे वाहत असून, गद्दारांना घरी बसवून महाविकास आघाडीचे अधिकाधिक खासदार निवडून आणण्याचा निर्धार नेते, युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी येथे केला.**



महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देशमुख यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते आज मंगळवारी बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार रोहित पवार, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड, उमेदवार संजय देशमुख आदी उपस्थित होते.यवतमाळमधील आजचे वातावरण बघून येथे महाविकास आघाडी जिंकणारच असा विश्वास वाटत असल्याचे आदित्य ठाकरे यावेळी म्हणाले. ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स हेच भाजपचे मित्रपक्ष आहेत, अशी टीका ठाकरे यांनी केली. भाजपसोबत कोणीही नव्हते तेव्हा शिवसेना सोबत होती. मात्र त्यांचे अच्छे दिन आले तेव्हा त्यांनी शिवसेनशी युती तोडली. वापरा आणि फेका हेच भाजपचे धोरण आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष फोडून त्यांच्यासोबत गेलेल्या गद्दारांची स्थिती आज अत्यंत बिकट झाल्याचे ठाकरे म्हणाले. महाविकास आघाडीने लोकांमधील उमदेवार दिला. मात्र यवतमाळ-वाशिममध्ये महायुतीला अजूनही उमेदवार मिळत नाही. ते महाविकास आघाडीच्या ताकदीला घाबरले आहेत, असे ठाकरे म्हणाले. जो कोणी अधिक बोली देईल त्याला उमेदवारी मिळू शकते. खोके घेणे आणि धोके देणे हे त्यांचे कामच आहे, अशी टीका करत 'अबकी बार भाजप तडीपार' असा नारा आदित्य ठाकरे यांनी यावेळी दिला.यावेळी बोलताना रोहित पवार यांनीही यवतमाळ आणि वाशिमचे लोक जे ठरवतात, तेच करून दाखवतात, असे सांगितले. महायुती जनतेत जाण्यास घाबरत असल्याने त्यांना उमेदवारही मिळत नसल्याची टीका पवार यांनी केली. ऐनवेळी निवडणूक लढविण्यास इच्छुक नसलेला उमेदवार महायुती जनतेवर थोपवेल, असे पवार म्हणाले.

### रॅलीत नागरिकांनी मोठी गर्दी केली

याप्रसंगी काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे यांनी, भाजपने आजपर्यंत केवळ धर्माच्या नावावर देशात दुही माजवली. विकासाची कोणतीच कामे केली नाहीत, असा आरोप केला. उमेदवार संजय देशमुख यांनी विद्यमान खासदारांवर टीका करून त्यांनी व महायुतीतील आमदारांनी जिल्ह्यात विकासाचे एकही काम केले नसल्याचा आरोप केला. या प्रचारसभेनंतर उपस्थितांनी शक्तीप्रदर्शन करत जिल्हाधिकारी कार्यालयात संजय देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. सभेस व रॅलीत नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.


# ते चीनचं नाव घ्यायलाही घाबरतात

## परराष्ट्रमंत्र्यांच्या प्रतिक्रियेवर काँग्रेसचा संताप

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अरुणाचल प्रदेशवरून भारत आणि चीन यांच्यात शाब्दिक युद्ध चालू असल्याचं पाहायला मिळत आहे. चीनने अरुणाचल प्रदेशमधील त्यांच्या सीमेनजिकच्या जवळपास ३० ठिकाणांची नावं बदलल्याचं वृत्त समोर आलं आहे. तसेच त्यांनी अरुणाचल प्रदेश या भारतातल्या राज्यावरच दावा ठोकला आहे. परंतु, अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचं केंद्राने निक्षूण सांगितलं आहे. यावर केंद्रीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.**



परंतु, जयशंकर यांची प्रतिक्रिया पाहून ते खूप हतबल वाटत आहेत अशी टीका काँग्रेसने केली आहे. जयशंकर म्हणाले, अरुणाचल प्रदेशमधील काही ठिकाणांची नावं बदलल्याने कोणताही परिणाम होणार नाही. तसेच ते म्हणाले, “आज मी तुमच्या घराचं नाव बदललं तर ते माझं होईल का? अरुणाचल प्रदेश हे भारताचं राज्य होतं, आहे आणि राहील. नाव बदलण्याचा कोणताही परिणाम होणार नाही. आपलं सैन्य प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर तैनात आहे. त्यामुळे काळजीचं काही कारण नाही.परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या प्रतिक्रियेनंतर काँग्रेसने जयशंकर यांच्यावर निशाणा साधला आहे. काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली आहे. या पत्रकार परिषदेत तिवारी म्हणाले, चीनने इतकं आक्रमक पाऊल उचलल्यानंतर त्यावर भारत सरकारने बोटचेपी भूमिका घेतली आहे. भारतासारख्या बलाढ्य राष्ट्राला न शोभणारी भूमिका घेतली आहे.खासदार मनीष तिवारी म्हणाले, एस. जयशंकर यांनी एक अद्भुत वक्तव्य केलं. ते म्हणाले, मी तुमच्या घराचं नाव बादललं तर ते घर माझं होणार नाही. आता कोणीतरी जयशंकर यांना सांगा की तुम्ही माझ्या घरावर तुमच्या नावाची पाटी लावली तर तो फौजदारी खटला होईल.

चीनने इतकं मोठं पाऊल उचलल्यानंतर जयशंकर यांनी इतकी बोटचेपी भूमिका घ्यावी? इतकं हतबल वक्तव्य करावं? चीनने इतकी आक्रमकता दाखवल्यानंतर आपलं सरकार मात्र हतबल असल्याचं दिसतंय.मनिष तिवारी म्हणाले, चीनने आपल्या अरुणाचल प्रदेशमधील ३० ठिकाणांची नावं बदलली आहेत आणि त्यावर भारत सरकारने बोटचेपी भूमिका घेतलीय, ही भारतासाठी अशोभनीय बाब आहे. भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी इतकं हतबल होणं त्यांना शोभत नाही. जे लोक पूर्वी कच्चा लिंबूच्या गोष्टी करायचे, काँग्रेसविरोधात गळा काढायचे तेच आता इतके हतबल दिसतायत हे खूप दुर्दैवी आहे. आपले परराष्ट्रमंत्री आणि आपलं सरकार चीनचं नाव काढायलाही घाबरतात. जयशंकर म्हणाले, अरुणाचल प्रदेशमधील काही ठिकाणांची नावं बदलल्याने कोणताही परिणाम होणार नाही. तसेच ते म्हणाले, “आज मी तुमच्या घराचं नाव बदललं तर ते माझं होईल का? अरुणाचल प्रदेश हे भारताचं राज्य होतं, आहे आणि राहील. नाव बदलण्याचा कोणताही परिणाम होणार नाही. आपलं सैन्य प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर तैनात आहे. त्यामुळे काळजीचं काही कारण नाही.परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या प्रतिक्रियेनंतर काँग्रेसने जयशंकर यांच्यावर निशाणा साधला आहे. काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली आहे. चीनने इतकं आक्रमक पाऊल उचलल्यानंतर त्यावर भारत सरकारने बोटचेपी भूमिका घेतली आहे. भारतासारख्या बलाढ्य राष्ट्राला न शोभणारी भूमिका घेतली आहे.खासदार मनीष तिवारी म्हणाले, एस. जयशंकर यांनी एक अद्भुत वक्तव्य केलं. ते म्हणाले, मी तुमच्या घराचं नाव बादललं तर ते घर माझं होणार नाही.

### आपलं सरकार मात्र हतबल

» परंतु, जयशंकर यांची प्रतिक्रिया पाहून ते खूप हतबल वाटत आहेत अशी टीका काँग्रेसने केली आहे. जयशंकर म्हणाले, अरुणाचल प्रदेशमधील काही ठिकाणांची नावं बदलल्याने कोणताही परिणाम होणार नाही. तसेच ते म्हणाले, “आज मी तुमच्या घराचं नाव बदललं तर ते माझं होईल का? अरुणाचल प्रदेश हे भारताचं राज्य होतं, आहे आणि राहील. नाव बदलण्याचा कोणताही परिणाम होणार नाही. आपलं सैन्य प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर तैनात आहे. अरुणाचल प्रदेशवरून भारत आणि चीन यांच्यात शाब्दिक युद्ध चालू असल्याचं पाहायला मिळत आहे. चीनने अरुणाचल प्रदेशमधील त्यांच्या सीमेनजिकच्या जवळपास ३० ठिकाणांची नावं बदलल्याचं वृत्त समोर आलं आहे. तसेच त्यांनी अरुणाचल प्रदेश या भारतातल्या राज्यावरच दावा ठोकला आहे. परंतु, अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचं केंद्राने निक्षूण सांगितलं आहे. यावर केंद्रीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे. चीनने इतकं मोठं पाऊल उचलल्यानंतर जयशंकर यांनी इतकी बोटचेपी भूमिका घ्यावी? इतकं हतबल वक्तव्य करावं? चीनने इतकी आक्रमकता दाखवल्यानंतर आपलं सरकार मात्र हतबल असल्याचं दिसतंय.


# ५५ आमदारांनी घेतली सुनीता केजरीवालांची भेट

## केजरीवाल यांचं मुख्यमंत्रीपद धोक्यात आलं असल्याची चर्चा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सध्या तिहार तुरुंगात आहेत. न्यायालयाने त्यांना १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे. ते १५ एप्रिलपर्यंत कोठडीत असतील. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांचं मुख्यमंत्रीपद धोक्यात आलं असल्याची चर्चा आहे. अरविंद केजरीवाल यांना त्यांचं मुख्यमंत्रीपद सोडावं लागलं तर या पदावर कोण बसणार? असा प्रश्नदेखील उपस्थित होत आहे.**



अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांच्या नावाची चर्चा आहे. त्याचबरोबर केजरीवाल यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री आतिशी मार्लेना यादेखील मुख्यमंत्री बनू शकतात.दरम्यान, आम आदमी पार्टीच्या ५५ आमदारांनी आजदुपारी सुनीता केजरीवाल यांची भेट घेतली. यावेळी सर्व आमदार सुनीता केजरीवाल यांना म्हणाले, दिल्लीतले २ कोटी रहिवासी केजरीवाल यांच्या पाठिशी उभी आहे. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊ नये. त्यांनी तुरुंगातूनच दिल्लीचं सरकार चालवावं. आपचे एकूण ५५ आमदार सुनीता यांना भेटले तर ४ आमदार सध्या दिल्लीत नसल्यामुळे आज या भेटीसाठी जाऊ शकले नाहीत. दिल्ली सरकारच्या कथित मद्यविक्री घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना राऊस जिल्हा न्यायालयाने सोमवारी (१ एप्रिल) १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे त्यांची रवानगी तिहार तुरुंगात करण्यात आली आहे. त्यानंतर ‘आप’चे नेते आणखी आक्रमक झाले आहेत. दिल्लीच्या मंत्री आतिशी मार्लेना यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेऊन भाजपावर गंभीर आरोप केले. आतिशी म्हणाल्या की, भाजपामध्ये पक्षप्रवेश करण्यासाठी माझ्याशी संपर्क साधण्यात आला. मी पक्षात आले नाही तर एका महिन्याच्या आत मला ईडीकडून अटक करण्यात येईल, अशी धमकी देण्यात आली आहे. माझ्या सहकाऱ्याशी संपर्क साधून हा प्रस्ताव देण्यात आला आहे. ती व्यक्ती मला म्हणाली, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा हे ‘आप’ला नष्ट करू इच्छितात.

### भाजपाच्या धमक्यांना घाबरणार नाही

» परंतु, आम्ही भाजपाच्या धमक्यांना घाबरणार नाही. आम्ही आमचं काम करत राहू. ‘आप’च्या आणखी चार नेत्यांना अटक करण्याचे षडयंत्र भाजपाकडून आखण्यात येत आहे.दिल्लीचे माजी शिक्षणमंत्री मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, संजय सिंह आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आधीच तुरुंगात धाडलेले आहे. भाजपा आणखी चार नेत्यांना तुरुंगात डांबण्याचं रचत असल्याचा आरोप आतिशी यांनी केला आहे. आतिशी म्हणाल्या, “माझ्यासह सौरभ भारद्वाज, दुर्गेश पाठक आणि राघव चड्ढा यांना अटक केली जाऊ शकते. दरम्यान, संजय सिंह यांना काही वेळापूर्वी जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# टायगर श्रॉफचा प्रँक पडला त्याच्यावरच भारी



अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ सोशल मीडियावर रोज नवनवीन व्हिडीओज शेअर करून आपला आगामी चित्रपट ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ चित्रपटाचं प्रमोशन करताना दिसतात. दोन्ही अभिनेत्यांचे हे व्हिडीओज इंटरनेटवर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरलही होतात. त्यात आज १ एप्रिल म्हणजेच ‘एप्रिल फूल’. अशातच टायगरने अक्षय कुमारसाठी चांगल्या प्रँकचं नियोजन केलं आणि अक्षयला खूप मोठा ‘एप्रिल फूल’ केला. या व्हिडीओत व्हॉलीबॉल गेम सुरू करण्याच्या आधी टायगर एका कोल्ड ड्रिंकच्या बाटलीला जोरात हलवून ती ठेवून देतो आणि सगळ्यांना खेळायला बोलावतो. अक्षयची एन्ट्री होताच टायगर त्याला ती बाटली उघडून द्यायला सांगतो. बाटली उघडताच कोल्ड ड्रिंकमध्ये जमा झालेला फेस अक्षयच्या तोंडावर उडतो. नंतर अक्षय हसत हसत सगळ्यांवर कोल्ड ड्रिंक उडवतो. या प्रँकला ‘एप्रिल फूल’चं गाणं जोडत टायगरनं अक्षयला चांगलंच ‘फूल’ बनवल्याचं या व्हिडीओत पाहायला मिळतंय. “एप्रिल फूल बडे मियाँ” असं कॅप्शन या व्हिडीओला टायगरनं दिलं आहे. टायगर आणि अक्षयचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत आपल्या प्रतिक्रिया शेअर केल्या आहेत. ‘खिलाडीबरोबरच खिलवाड’, ‘छोटे मियाँनं बदला घेतला’ अशा अनेक कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत.दरम्यान, ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ चित्रपटाबद्दल सांगायचं झालं, तरं हा चित्रपट ईदच्या मुहूर्तावर म्हणजेच १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ सोशल मीडियावर रोज नवनवीन व्हिडीओज शेअर करून आपला आगामी चित्रपट ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ चित्रपटाचं प्रमोशन करताना दिसतात. दोन्ही अभिनेत्यांचे हे व्हिडीओज इंटरनेटवर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरलही होतात.या व्हिडीओत व्हॉलीबॉल गेम सुरू करण्याच्या आधी टायगर एका कोल्ड ड्रिंकच्या बाटलीला जोरात हलवून ती ठेवून देतो आणि सगळ्यांना खेळायला बोलावतो.

# आलियाच्या लग्नात पळवले होते रणबीरचे शूज

रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांची जोडी बॉलीवूडमध्ये कायम चर्चेत असते. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर या जोडीने १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. डेस्टिनेशन वेडिंग करण्यापेक्षा आलिया-रणबीरने घरच्या घरी लग्न करण्यास पसंती दर्शवली. या दोघांच्या लग्नाला फक्त जवळचे नातेवाईक उपस्थित होते. लग्न समारंभातील प्रथेनुसार वधूच्या बहिणी नवऱ्या मुलाच्या चपला किंवा शूज पळवतात व त्यानंतर भेटवस्तू मागतात. रणबीरच्या लग्नात आलियाच्या बहिणींनी शूज पळवल्यावर अभिनेत्याने त्याच्या मेव्हणीला ११ ते १२ कोटी रुपये दिले होते अशा चर्चा तेव्हा सर्वत्र रंगल्या होत्या. याबाबत रणबीरने कपिल शर्माच्या शोमध्ये खुलासा केला आहे. रणबीर कपूर, त्याची आई नीतू व बहीण रिद्धिमा यांनी नुकतीच ‘द ग्रेट इंडियन कपिल शो’ या कार्यक्रमात उपस्थिती लावली होती. यावेळी कपिलने रणबीरला लग्नात या शूज पळवण्याच्या विधीबद्दल विचारलं.कपिल म्हणाला, “आम्ही असं ऐकलंय की, तुमच्या लग्नात आलियाच्या बहिणींनी तुझे शूज चोरले होते आणि ते परत घेण्यासाठी तू मेव्हणीला ११ ते १२ कोटी दिलेस हे खरं आहे का?” यावर रणबीर म्हणाला, “आलियाच्या कोणत्याही बहिणीने माझ्याकडे एवढे कोटी रुपये वगैरे मागितले नाहीत. त्यांनी शूज चोरल्यावर काही लाखांची मागणी केली होती. पण, मी त्यांच्याबरोबर बार्गेनिंग करून त्यांना काही हजारांवर आणलं आणि तेवढेच पैसे मी त्यांना दिले होते.”“आमचं लग्न तसंही घरच्या घरी झालं होतं. त्यामुळे जरी त्यांनी मला शूज दिले नसते, तरीही ते घरीच राहिले असते. मी पण घरी असाच राहिलो असतो.” असं मजेशीर उत्तर रणबीर कपूरने दिलं. दरम्यान, आलिया भट्ट व रणबीर कपूर आता सुखी वैवाहिक आयुष्य जगत आहेत. २०२२ च्या एप्रिलमध्ये लग्नगाठ बांधल्यावर ६ नोव्हेंबर २०२२ रोजी अभिनेत्रीने गोंडस लेकीला जन्म दिला. या जोडप्याची लेक राहा सुद्धा आता सोशल मीडियावर चांगलीच लोकप्रिय झाली आहे. लवकरच ही जोडी ‘ब्रह्मास्त्र’ चित्रपटाच्या दुसऱ्या भागात एकत्र झळकणार आहे. रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांची जोडी बॉलीवूडमध्ये कायम चर्चेत असते. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर या जोडीने १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. डेस्टिनेशन वेडिंग करण्यापेक्षा आलिया-रणबीरने घरच्या घरी लग्न करण्यास पसंती दर्शवली.



# पूजा रोहन ला करतेय डेट?

अभिनेत्री पूजा हेगडे बॉलीवूड आणि दाक्षिणात्य इंडस्ट्रीमधून जगभरात आपली ओळख निर्माण केली. आपल्या व्यावसायिक आयुष्याबाबत जेवढी ती उघडपणे बोलते तितकंच आपलं वैयक्तिक आयुष्य तिला खासगी ठेवायला आवडतं. अशातच पूजा हेगडे तिच्या कथित बॉयफ्रेंड रोहन मेहराबरोबर पुन्हा एकदा दिसली. वांद्रे येथे एकत्र फिरताना पापाराझींनी त्यांचे फोटोज काढले, त्या वेळेस दोघंही एकाच कारमध्ये होते. यावेळी पूजानं सफेद रंगाचा शर्ट, ग्रे ट्राउजर व काळे बूट घातले होते; तर रोहननं काळ्या रंगाचा टी-शर्ट, निळी पॅन्ट व सफेद शूज, असा कॅज्युअल लूक केला होता. पूजा हेगडे गेल्या काही दिवसांपासून रोहनला डेट करीत असल्याची चर्चा सुरू आहे. रोहन दिवंगत अभिनेते विनोद मेहरा यांचा मुलगा आहे. रोहननं २०१८ मध्ये सैफ अली खानबरोबर ‘बाजार’ या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. रोहनचं नाव याआधी तारा सुतारियाबरोबर जोडलं गेलं होतं. तथापि, मे २०१९ मध्ये दोघे विभक्त झाल्याची माहिती समोर येऊ लागली.२०२३ मध्ये पूजा एका क्रिकेटरला डेट करत आहे आणि लवकरच ती त्याच्याशी लग्न करणार आहे अशा चर्चांना उधाण आलं होतं. तथापि, ‘द फ्री प्रेस जर्नल’नं दिलेल्या वृत्तानुसार, अभिनेत्रीनं या अफवा खोडून काढल्या आणि जाहीर केलं की, त्या खोट्या आहेत.दरम्यान, पूजाच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर पूजा सलमान खानबरोबर ‘किसी का भाई किसी की जान’ या चित्रपटामध्ये शेवटची दिसली होती. फरहाद सामजी दिग्दर्शित या चित्रपटात व्यंकटेश दग्गुबती, जगपती बाबू, भूमिका चावला, विजेंदर सिंग, अभिमन्यू सिंग, राघव जुयाल, सिद्धार्थ निगम, जस्सी गिल, शहनाज गिल, पलक तिवारी व विनाली भटनागर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# जिजाजींना नाही आणलं का?

अदिती राव हैदरीने अभिनेता सिद्धार्थबरोबर साखरपुडा केला आहे. साखरपुड्यानंतर पहिल्यांदाच शनिवारी ती मुंबई विमानतळावर दिसली. सिद्धार्थशी साखरपुडा केल्यानंतर पहिल्यांदाच ती सार्वजनिक ठिकाणी दिसली. अदितीने एअरपोर्ट लूकसाठी डेनिम शर्टसह लेयर्ड को-ऑर्डर सेट घातला होता. ती खूप छान दिसत होती. यावेळी एका पापाराझीने तिला सिद्धार्थबद्दल विचारलं. त्यावर अदिती लाजताना दिसली. अदितीला पापाराझीने सिद्धार्थबद्दल विचारलं. “सरांना नाही आणलं का? माफ करा, जिजाजींना नाही आणलं का?” असं विचारल्यावर अदिती लाजत हसू लागली. नंतर तिने सांगितलं की सिद्धार्थ तिच्याबरोबर आला नसून कामानिमित्त दुसरीकडे गेला आहे.



# अंकिताच्या लग्नात अमृताने लक्ष वेधून घेतलं

रणदीप हुड्डा दिग्दर्शित ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ चित्रपट आता प्रेक्षकांना मराठीत पाहता येणार आहे. या चित्रपटाच्या मराठी प्रीमियरला अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. यामध्ये रणदीप हुड्डासह अभिनेत्री अंकिता लोखंडे प्रमुख भूमिकेत झळकली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई सावरकर यांची भूमिका अंकिताने साकारली आहे. या चित्रपटाच्या मराठी स्क्रिनिंगला



अमृता खानविलकरने देखील खास उपस्थिती लावली होती. अंकिता आणि अमृता या दोघीही गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकींच्या घट्ट मैत्रिणी आहेत. अमृता याआधी लाडक्या मैत्रिणीला पाठिंबा देण्यासाठी ‘बिग बॉस’च्या घरात देखील पोहोचली होती. याशिवाय अंकिताच्या लग्नात सुद्धा अमृताने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ चित्रपटाच्या नुकत्याच पार पडलेल्या प्रीमियर शोला सुद्धा तिने हजेरी लावली होती.चित्रपट पाहिल्यावर अमृताने रणदीपसह अंकिताचं कौतुक करण्यासाठी खास पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्री लिहिते, “‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ हा चित्रपट मराठीत पाहण्याची संधी मिळाली. रणदीप सरांचं अभिनय कौशल्य अद्भुत आहे.

# लखनऊने नोंदवला दुसरा विजय!

## मयंकच्या वेगवान माऱ्यापुढे आरसीबीचे फलंदाज हतबल

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील १५वा सामना बंगळुरुच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि लखनऊ सुपरजायंट्स आमनेसामने आले होते. या सामन्यात लखनऊने मयंक यादवच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर आसीबीचा २८ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील आपला दुसरा विजय नोंदवला. या विजयात मयंक-डी कॉक यांच्याशिवाय कर्णधार निकोलस पूरनने मोलाचे योगदान दिले.**



या सामन्यात लखनऊ सुपरजायंट्स संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना क्विंटन डी कॉकच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर २० षटकांत ५ बाद १८१ धावा केल्या होत्या. त्याचबरोबर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाला १८२ धावांचे लक्ष्य दिले होते. मात्र, प्रत्युत्तरात आरबीसीचा संघ १९.४ षटकांत १५३ धावांर गारद झाला. आरसीबीसाठी महिपाल लॉमरोरने सर्वाधिक ३३ धावांची खेळी साकारली. त्याचबरोबर विराट कोहली (२२), प्लेसिस (१९) आणि पाटीदार (२९) यांनी धावांचे योगदाने दिले. लखनऊकडून मयंकने शानदार गोलंदाजी करताना ४ षटकांत १४ धावा देत ३ महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या. या बरोबरच त्याने सलग दुसऱ्या सामन्यात 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्कार पटकावला.लखनऊसाठी क्विंटन डी कॉकने ५६ चेंडूत ८१ धावांची स्फोटक खेळी खेळली. त्याच्या बॅटमधून ८ चौकार आणि ५ षटकार आले. या खेळीत अनेक चढ-उतार पाहायला मिळाले.

एके काळी १४व्या षटकात लखनऊची धावसंख्या १३० धावा होती, त्यानंतर लखनऊ २०० चा टप्पा पार करेल असे वाटत होते, पण त्यानंतर आरसीबीच्या गोलंदाजांनी जोरदार पुनरागमन केले आणि लखनऊने १८ षटकात १४८ धावांत ५ विकेट गमावल्या. त्यानंतर धावसंख्या १७० पर्यंत पोहोचेल असे वाटत होते, पण त्यानंतर पुरणने षटकारांचा वर्षाव केला. पुरण २१ चेंडूत ४० धावा करून नाबाद परतला. त्याच्या बॅटमधून एक चौकार आणि ५ षटकार आले.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांबद्दल बोलायचे तर ग्लेन मॅक्सवेल हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. ग्लेन मॅक्सवेलने लखनौ सुपर जायंट्सच्या २ फलंदाजांना आपला बाद केले. याशिवाय रीस टोपले, मोहम्मद सिराज आणि यश दयाल यांनी १-१ विकेट घेतली.

### विराट कोहलीचा 100 वा सामना

» आयपीएल २०२४ मधील १५वा सामना बंगळुरुच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि लखनऊ सुपरजायंट्स आमनेसामने आले होते. विराट कोहली चिन्नास्वामी स्टेडियमवर १०० वा टी-२० सामना खेळणारा पहिला फलंदाज ठरला आहे. अशा परिस्थितीत एकाच मैदानावर १०० टी-२० सामने खेळणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. चिन्नास्वामी स्टेडियम हे आरसीबीचे होम ग्राउंड आहे. आयपीएल २०२४ मध्ये विराट कोहली जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. तो सध्या आयपीएलमध्ये संयुक्तपणे सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्याने ३ सामन्यात १८१ धावा केल्या आहेत. त्याच्याशिवाय रियान परागनेही १८१ धावा केल्या आहेत.

लखनऊसाठी क्विंटन डी कॉकने ५६ चेंडूत ८१ धावांची स्फोटक खेळी खेळली. त्याच्या बॅटमधून ८ चौकार आणि ५ षटकार आले. या खेळीत अनेक चढ-उतार पाहायला मिळाले. एके काळी १४व्या षटकात लखनऊची धावसंख्या १३० धावा होती, त्यानंतर लखनऊ २०० चा टप्पा पार करेल असे वाटत होते, पण त्यानंतर आरसीबीच्या गोलंदाजांनी जोरदार पुनरागमन केले आणि लखनऊने १८ षटकात १४८ धावांत ५ विकेट गमावल्या. त्यानंतर धावसंख्या १७० पर्यंत पोहोचेल असे वाटत होते, पण त्यानंतर पुरणने षटकारांचा वर्षाव केला. पुरण २१ चेंडूत ४० धावा करून नाबाद परतला. त्याच्या बॅटमधून एक चौकार आणि ५ षटकार आले.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांबद्दल बोलायचे तर ग्लेन मॅक्सवेल हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. ग्लेन मॅक्सवेलने लखनौ सुपर जायंट्सच्या २ फलंदाजांना आपला बाद केले. याशिवाय रीस टोपले, मोहम्मद सिराज आणि यश दयाल यांनी १-१ विकेट घेतली.

# विराटने चिन्नास्वामी स्टेडियमवर रचला इतिहास!

## अनोखं शतक झळकावणारा ठरला पहिला भारतीय खेळाडू

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील १५वा सामना चिन्नास्वामी स्टेडियम बंगलुरु येथे खेळला जात आहे. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि लखनऊ सुपरजायंट्स आमनेसामने आहेत. या सामन्यात आरसीबीचा कर्णधार फाफ डू प्लेसिसने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नाणेफेकीनंतर सामन्यात क्षेत्ररक्षण करायला उतरलेल्या आरसीबीच्या स्टार खेळाडू विराट कोहलीने मैदानात उतरताच इतिहास रचला. विराटने जे केले ते आजपर्यंत कोणताही भारतीय फलंदाज करू शकलेला नाही.**



विराट कोहली चिन्नास्वामी स्टेडियमवर १०० वा टी-२० सामना खेळणारा पहिला फलंदाज ठरला आहे. अशा परिस्थितीत एकाच मैदानावर १०० टी-२० सामने खेळणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. चिन्नास्वामी स्टेडियम हे आरसीबीचे होम ग्राउंड आहे. आयपीएल २०२४ मध्ये विराट कोहली जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. तो सध्या आयपीएलमध्ये संयुक्तपणे सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्याने ३ सामन्यात १८१ धावा केल्या आहेत. त्याच्याशिवाय रियान परागनेही १८१ धावा केल्या आहेत.चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या पहिल्या सामन्यात विराट कोहली काही विशेष करू शकला नाही. त्याने २० चेंडूत २१ धावांची खेळी खेळली. यानंतर विराटने शानदार पुनरागमन करत पुढच्या २ सामन्यात अर्धशतके झळकावली. विराट कोहलीने पंजाब किंग्जविरुद्ध ४९ चेंडूत ७७ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने ११ चौकार आणि २ षटकार मारले. विराटने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या गेल्या सामन्यातही चांगली कामगिरी केली होती. तो ५९ चेंडूत ८३ धावा केल्यानंतर नाबाद परतला. यादरम्यान त्याने ४ चौकार आणि ४ षटकार मारले.

### 100 सामने खेळणारा पहिला

» मात्र, आरसीबीने हा सामना ७ विकेटने गमावला.आयपीएलच्या १७व्या हंगामातील १५वा सामना चिन्नास्वामी स्टेडियम बंगलुरु येथे खेळला जात आहे. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि लखनऊ सुपरजायंट्स आमनेसामने आहेत. या सामन्यात आरसीबीचा कर्णधार फाफ डू प्लेसिसने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. विराट कोहली चिन्नास्वामी स्टेडियमवर १०० वा टी-२० सामना खेळणारा पहिला फलंदाज ठरला आहे. अशा परिस्थितीत एकाच मैदानावर १०० टी-२० सामने खेळणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. नाणेफेकीनंतर सामन्यात क्षेत्ररक्षण करायला उतरलेल्या आरसीबीच्या स्टार खेळाडू विराट कोहलीने मैदानात उतरताच इतिहास रचला.